**[वेळ : 3.00 तास ]** **[गुण : 100 ]**

**कृपया तुम्हाला योग्य प्रश्नपत्रिका मिळाली आहे का ते तपासा.**

**सूचना : १. सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.**
**२. अंतर्गत पर्याय लक्षात घ्या.**
**३. प्रश्नासमोरील अंक गुण दर्शवितात.**

**प्र. १ अ.** मराठी भाषेचा उत्पत्ती काल व त्याबद्दलची मते नोंदवून प्राचीन मराठी कोरीव लेखातील मराठी वाक्यरचना व शब्दरूपाचे स्वरूप सांगा. २०

**किंवा**

**ब.** महानुभाव पंथातील साहित्य संपदेचा परिचय करून देऊन महानुभाव वाङ्मयाची वैशिष्ट्ये नमूद करा.

**प्र. २ अ.** यादवकालीन वारकरी संप्रदायाची स्थापना सांगून या कालखंडातील संतमेळयाच्या अभंगवाणाचे स्वरूप व महत्त्व साधार नमूद करा. २०

**किंवा**

**ब.** महानुभाव पंथातील 'पंचकृष्ण' ही संकल्पना स्पष्ट करून महानुभाव पंथाचे आचारधर्म व या पंथाचे तत्त्वज्ञान सांगा.

**प्र.३ अ.** बहामनीकाळातही वारकरी पंथाचे विचारकार्य करणाऱ्या संत एकनाथ यांच्या ग्रंथ कर्तुत्वाची ओळख करून द्या. २०

**किंवा**

**ब.** वारकरी पंथाचा विचार सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवणाऱ्या संत तुकाराम यांच्या अभंगातील माधुर्य साधार स्पष्ट करा.

**प्र. ४ अ.** पंडिती काव्याचे स्वरूप स्पष्ट करून या काव्याच्या प्रेरणा आणि वैशिष्ट्ये स्पष्ट करा. २०

**किंवा**

**ब.** पंडिती काव्यपरंपरेतील वामन पंडित व रघुनाथ पंडित यांचे योगदान नोंदवा.

**प्र.५** पुढीलपैकी कोणत्याही **दोन टिपा** लिहा. २०

**अ.** महानुभाव पंथाचे टिकाग्रंथ
**ब.** संत नामदेवांचे आत्मचरित्रपर अभंग
**क.** महानुभाव पंथातील चांगदेव राऊळ यांचे व्यक्तिमत्त्व
**ड.** पंडिती काव्यातील दोष

*****************



XSAGARDADMINY1C2EFCXSAGARDADMINY1C2EFC